लोकसत्ता
लोकमान्य, लोकशक्ती !

**Dated 22.02.2022**

## पहिल्या टप्प्यात तब्बल २१ महिला मेट्रो चालकांचा समावेश

# ‘मेट्रो २ अ’, ‘मेट्रो ७’चे सारथ्य महिलांकडे

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** बहुप्रतीक्षित ‘मेट्रो २ अ’ (दहिसर ते डीएन नगर) आणि ‘मेट्रो ७’ (दहिसर पूर्व ते अंधेरी पूर्व) मार्गिकेतील पहिल्या टप्प्याची सुरक्षा चाचणी सुरू झाली आहे. त्यामुळे आता लवकरच दोन्ही मार्गिकेतील पहिला टप्पा सुरू होण्याची चिन्हे असून मेट्रोचे सारथ्य करण्यासाठी २१ महिला मेट्रोचालक (मेट्रो ट्रेन पायलट) सज्ज झाल्या आहेत.

‘मेट्रो २ अ’चा डहाणूकरवाडी ते आनंदनगर आणि ‘मेट्रो ७’चा दहिसर ते आरे असा टप्पा लवकरच वाहतुकीसाठी खुला होणार आहे. सध्या या मार्गांवर सुरक्षा चाचणी सुरू आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने महामुंबई मेट्रो ऑपरेशन कॉर्पोरेशनच्या (एमएमएमओसीएल) माध्यमातून पहिला टप्पा सुरू करण्यासाठीची सर्व तयारी पूर्ण केली आहे. तसेच प्रशिक्षण पूर्ण करून कर्मचारीवृंद सज्ज ठेवला आहे.

एमएमएमओसीएलने मेट्रोचालकांची नियुक्ती करताना महिलांना प्राधान्य दिले आहे. एकूण ९७ मेट्रोचालकांची निवड करून त्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

या ९७ मेट्रोचालकांमध्ये २१ महिला मेट्रोचालकांचा समावेश असल्याची माहिती एमएमआरडीएतील वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली. त्यामुळे या दोन्ही मेट्रो मार्गावरील मेट्रो गाड्यांचे सारथ्य करताना दिसणार आहेत. इलेक्ट्रिकल/इलेक्ट्रॉनिक्स, इलेक्ट्रॉनिक्स आणि टेलिकम्युनिकेशन, मेकॅनिकलमधील डिप्लोमा तसेच बीएससी (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित) अशी शैक्षणिक पात्रता यासाठी आवश्यक आहे. त्यानुसार ‘एमएमएमओसीएल’ने २१ महिला मेट्रोचालकांची निवड केली आहे. वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर ‘मेट्रो १’मध्ये दोन मेट्रोचालक सेवा देत आहेत. आता भविष्यात मेट्रो मार्गिका खुल्या होत जातील तशी महिला चालकांची संख्याही वाढत जाईल, असेही या अधिकाऱ्याने सांगितले.

### स्वयंचलित मेट्रो गाड्या

एमएमआरडीए मेट्रो प्रकल्पासाठी बंगळुरू येथील एका कंपनीकडून देशी बनावटीच्या मेट्रो गाड्यांची बांधणी करून घेत आहे. यातीलच १० गाड्या पहिल्या टप्प्यासाठी सज्ज झाल्या आहेत. या गाड्यांचे वैशिष्ट्य म्हणजे या चालकविरहित अशा स्वयंचलित गाड्या आहेत. पण सुरुवातीला मात्र मेट्रोचालकांद्वारेच मेट्रो गाड्या चालविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. पुढे स्वयंचलित पद्धतीने गाड्या चालवल्या जाणार आहेत. मात्र असे असले तरी गाडीत मेट्रोचालक आहेत. तर गाडी कारशेडमध्ये उभी करणे, दुरुस्तीसाठी नेणे यासाठी मेट्रोचालकांची आवश्यकता भासेल, अशी माहितीही अधिकाऱ्याने दिली.



### ‘महिलांसाठी नवीन क्षेत्र खुले झाल्याचा आनंद’

‘मेट्रो चालवण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. मात्र, त्याच वेळी मनात काहीशी भीती पण आहे. प्रवाशांना सुरक्षित प्रवास देण्याची हमी आम्ही देतो. महत्त्वाचे म्हणजे यानिमित्ताने एक नवे क्षेत्र महिलांसाठी खुले होत असल्याचा आनंद आहे, अशी प्रतिक्रिया मेट्रोचालक म्हणून नियुक्त झालेल्या तृप्ती शेट्ये यांनी दिली. ‘वेगळ्या क्षेत्रात काम करायचे असे मी सुरुवातीपासूनच ठरविले होते. दोन वर्षांपूर्वी ‘एमएमएमओसीएल’ची जाहिरात पाहिली. महिला विमान चालवतात, मग मेट्रो का नाही असा विचार करून मी अर्ज भरला आणि माझी निवड झाली. सर्व परीक्षा उत्तीर्ण होऊन मी अंतिमतः मेट्रो ट्रेन पायलट म्हणून नियुक्त झाले. आमचे सहा महिन्यांचे प्रशिक्षण हैदराबाद मेट्रोमध्ये पूर्ण झाल्यानंतर वर्सोवा-अंधेरी-घाटकोपर मेट्रोमध्ये एक महिन्याचे प्रशिक्षणही घेतले. आता आम्ही सज्ज आहोत,’ असे त्या म्हणाल्या.